मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# धोकादायक इमारतींसाठी 'कागदी घोड्यां'चा खेळ

## शहरातील 88 इमारती धोकादायक : महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष, नोटीस बजावण्यापलीकडे ठोस कारवाई नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू होण्यापूर्वी शहरातील जुन्या इमारतींना पावसाळ्यात धोका निर्माण होतो, अशा इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना व आसपासच्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. तो टाळण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने जुन्या इमारतींची पाहणी केली जाणार आहे. त्यात पिंपरी-चिंचवडमध्ये तब्बल ८८ इमारती धोकादायक असून त्या इमारतींना महापालिकेने केवळ नोटीस बजावली आहे. त्यामुळे सदरील इमारत पडून नागरिकांच्या जीवितास धोका झाल्यास महापालिका जबाबदारी घेणार आहे का, असा सवाल नागरिक करत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरातील धोकादायक इमारतींकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष असल्याचे दिसत आहे. केवळ कागदी घोडे नाचवले जात असून अधिकाऱ्यांकडून ठोस कार्यवाही केली जात नसल्याचे दिसत आहे. गतवर्षी शहरातील धोकादायक असणाऱ्या इमारतींना फक्त नोटिसा दिल्या. मात्र, अतिधोकादायक इमारती पाडण्याचे धाडस महापालिकेने दाखवले नाही. पावसाळ्यात धोकादायक इमारती कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता असते. त्यामुळे शहरातील धोकादायक बांधकामे स्वतःहून काढून घ्यावीत किंवा ती तातडीने दुरुस्त करून घ्यावीत, असे महापालिकेच्या बांधकाम परवानगी विभागाच्या वतीने दरवर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी सांगितले जाते. तसे जाहीर प्रकटन देऊन वर्षानुवर्षे तेच ते कागदी घोडे नाचवले जात आहेत. मात्र कोणतीही ठोस भूमिका घेतली जात नाही. त्यामुळे धोकादायक इमारतींचा धोका नागरिकांवर कायम असल्याचे दिसत आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात जून २०२३ पर्यंत ८८ धोकादायक इमारती व घरे धोकादायक होती. यामध्ये अति धोकादायक १७ इमारती आहेत. त्यांना महापालिकेने केवळ नोटीस दिली. त्यानंतर ८८ पैकी १८ इमारती रिकाम्या करून त्यांची दुरुस्ती केल्याचे सांगितले जात आहे. तर तीन इमारती रिकाम्या न करता दुरुस्ती केली गेली. ६७ इमारतींची किरकोळ दुरुस्ती करण्यात आली आहे, असे महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडून सांगितले जात आहे.



### जुन्या इमारतींची पाहणी करणार

» पावसाळा सुरू होत असल्याने जुन्या इमारतींना पावसाळ्यामुळे धोका निर्माण होतो, अशा इमारतींमध्ये राहणाऱ्या नागरिकांना व आसपासच्या नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो. तो टाळण्याच्या दृष्टीने महापालिकेच्या वतीने जुन्या इमारतींची पाहणी केली जाणार आहे. पावसाळ्यात धोक्याच्या इमारतीमध्ये न राहता दुसरीकडे राहण्याची व्यवस्था करणे अधिक योग्य होईल, धोक्याच्या इमारतींबाबत दुरुस्तीसाठी मालक अथवा भाडेकरू यांच्याकडून येणाऱ्या अर्जाचा प्राधान्याने विचार करण्यात येईल, असे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, शहरात पावसाळ्यात धोक्याच्या इमारतींमध्ये न राहता दुसरीकडे राहण्याची व्यवस्था करणे अधिक योग्य होईल, धोक्याच्या इमारतींबाबत दुरुस्तीसाठी मालक अथवा भाडेकरू यांच्याकडून येणाऱ्या अर्जाचा प्राधान्याने विचार करण्यात येईल, असे महापालिकेकडून सांगण्यात आले आहे.

### इमारत कलली, बिल्डरांवर गुन्हाच नाही

वाकड येथील इमारत अचानक कलली होती. दाट लोकवस्ती असलेल्या वाकड भागात बांधकाम करण्यात येत असताना कललेली इमारत अखेर महापालिकेने पाडली. दरम्यान, धोकादायक काम केल्यामुळे विकसकाला नोटीस दिली होती. त्यानंतर गुन्हा नोंद करणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. मात्र, तीन महिने उलटले तरीही गुन्हा दाखल केलेला नाही. पोलीस गुन्हा दाखल करून घेत नाहीत. आम्ही तीन वेळा जाऊन आलो. पण कोणती कलमाद्वारे गुन्हा दाखल करायचा, असा सवाल पोलीस अधिकाऱ्यांना विचारत आहेत.

# बारणेंच्या प्रचारासाठी भाजपचा ‘डोअर टू डोअर’ प्रचार

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची सभा : भाजपचे मावळ विधानसभा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघासाठी चौथ्या टप्प्यात 13 मे रोजी मतदान होणार आहे. प्रचारासाठी शेवटचा एक आठवडा शिल्लक आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांनी ‘डोअर टू डोअर’ प्रचार मोहीम हाती घेतली असल्याची माहिती भाजपचे मावळ विधानसभा निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे यांनी दिली.

मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना- भाजप- राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय- रासप- मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी भाजपने मावळ तालुक्यात आघाडी घेतली आहे. बारणे यांच्या प्रचारासाठी मावळ विधानसभा मतदार संघातील सर्व 381 बूथवर भारतीय जनता पार्टी व महायुती कडून ‘डोअर टू डोअर’ प्रचार करून नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी श्रीरंग बारणे यांना मत देऊन प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन नागरिकांना केले जात आहे.



### सोमवारी देवेंद्र फडणवीस यांची सभा..

»महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सोमवारी (दि. 6) जाहीर सभा होणार आहे. ही सभा कापसे लॉन्स, रहाटणी येथे सोमवारी दुपारी दोन वाजता होणार आहे. मावळ विधानसभा मतदार संघातील महायुतीच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने या प्रचार सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन देखील रविंद्र भेगडे यांनी केले आहे.

# 'बारामती'साठी उद्या मतदान; प्रशासकीय यंत्रणा सज्ज

## बारामती मतदारसंघात 23 लाख 72 हजार मतदार : एकूण 2 हजार 516 मतदान केंद्र

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील बारामती मतदसंघासाठी मंगळवार (दि.7) रोजी मतदान होणार आहे. या मतदारसंघात 23 लाख 72 हजार मतदार असून, एकूण 2 हजार 516 मतदान केंद्र आहेत. तर, सकाळी सात ते सायंकाळी सहा या वेळेत मतदान करता येणार आहे. मतदानाच्यादृष्टीने सर्व तयारी पूर्ण झाली आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी यांनी दिली.

या बाबतची माहिती देण्यासाठी विधानभवन येथे पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. कडक उन्हाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक मतदान केंद्रावर मेडिकल किट देण्यात आले आहे. मतदानासाठी मोठी रांग असेल, तर प्रतिक्षा हॉल उपलब्ध असतील. एकाच ठिकाणी पाचपेक्षा अधिक मतदान केंद्र असतील, तर तेथे मांडव टाकण्यात येणार आहे. मतदान केंद्रावर सेल्फी पॉइंट असेल. तसेच ज्येष्ठ नागरिकांचे मतदान केंद्रात फुल देऊन स्वागत केले जाणार आहे, अशी माहिती द्विवेदी यांनी दिली.



ईव्हीएमची सरमिसळ प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. विधानसभा मतदारसंघनिहाय ईव्हीएम मशीनचे वाटप केले जाणार आहे. निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे सोमवारी अंतिम प्रशिक्षण घेतले जाणार असून त्यानंतर कर्मचारी मतदान केंद्रावर रवाना होतील. निवडणुक कर्मचारी-अधिकारी यांना मतदान केंद्रावर जाण्यासाठी बसेसची सुविधा करण्यात आली आहे.

**निवडणुकीसाठी आवश्यक कर्मचारी - सुमारे 20 हजार**

- पोलीस बंदोबस्तासाठी 8 हजार 509 कर्मचारी
- राज्य राखीव दलाच्या आठ तुकड्या
- केंद्रीय पोलीस दलाच्या 12 तुकड्या
- होमगार्ड -2 हजार 81

**बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदारांची संख्या**

| विधानसभा | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|
| दौंड | 1,57,813 | 1,46,783 | 3,04,607 |
| इंदापूर | 1,67,483 | 1,56,046 | 3,23,541 |
| बारामती | 1,88,490 | 1,80,707 | 3,69,217 |
| पुरंदर | 2,24,905 | 2,04,416 | 4,29,351 |
| भोर | 2,16,932 | 1,90,985 | 4,07,921 |
| खडकवासला | 2,86,322 | 2,51,670 | 5,38,031 |
| एकूण | 12,41,945 | 11,30,607 | 23,72,668 |

**मतदान साहित्याचे येथून होणार वाटप**

दौंड : शासकीय धान्य गोदाम, दौंड
इंदापूर : शासकीय धान्य गोदाम कालठण रोड, इंदापूर
बारामती : वखार महामंडळ, औद्योगिक वसाहत महामंडळ परिसर, बारामती
पुरंदर : श्री कातोबा हायस्कूल दिवे
भोर : औद्योगिक प्रशिक्षण संस्था, भोर
खडकवासला : स्प्रिंग डेल प्ले ग्राऊंड, वडगाव बु. ता. हवेली
वेल्हे तालुका : जुनी पंचायत समिती इमारत, व जिल्हा परिषद मध्यवर्ती शाळा कुरण खुर्द,
मुळशी तालुका : राणी लक्ष्मीबाई सैनिकी मुलींची शाळा कासार आंबोली.

**बारामती लोकसभा मतदारसंघातील मतदान केंद्र व कर्मचार्यांची संख्या**

विधानसभा - मतदान केंद्र - कर्मचारी संख्या
दौंड – 309 – 2,597
इंदापूर – 330 -2,518
बारामती – 380 -3,500
पुरंदर – 421 – 3,377
भोर – 561 – 4,062
खडकवासला – 465 -4,049

# पाणीटंचाईने फळभाज्यांची आवक घटली

## कांदा, शेवगा, घेवडा, मटार, फ्लॉवरच्या भावात 5 ते 10 टक्के वाढ : भुईमूग शेंगांच्या भावात घट

**पुणे | प्रतिनिधी**

पाणीटंचाई आणि उन्हाची तीव्रता वाढल्याने मार्केट यार्डात मागील आठवड्याच्या तुलनेत फळभाज्यांची आवक काहीशी कमी झाली आहे. त्या तुलनेत फळभाज्यांना मागणी जास्त असल्याने कांदा, शेवगा, घेवडा, मटार, फ्लॉवरच्या भावात ५ ते १० टक्के वाढ झाली आहे, तर मागणी कमी असल्याने केवळ भुईमुग शेंगांच्या भावात घट झाली आहे. मागणी आणि पुरवठा यातील समतोलामुळे उर्वरित फळभाज्यांचे भाव मागील आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहेत.



येथील बाजारात रविवारी (दि. ५) राज्यासह परराज्यातून भाजीपाल्याची सुमारे ९० ट्रक आवक झाली. परराज्यातून झालेल्या आवकमध्ये कर्नाटक, गुजरात व आंध्र प्रदेश येथून हिरवी मिरची सुमारे १० ते १२ टेम्पो, कर्नाटक आणि आंध्र प्रदेश येथून तोतापुरी कैरी प्रत्येकी १ हजार बॉक्स, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी प्रत्येकी ३ ते ४ टेम्पो, कर्नाटक येथून घेवडा ४ ते ५ टेम्पो, हिमाचल प्रदेश येथून मटार ४ ट्रक, कर्नाटक येथून पावटा २ टेम्पो आणि बेळगाव येथून भुईमूग शेंगा २ टेम्पो, तर आंध्र प्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा ४ ते ५ टेम्पो, मध्य प्रदेश येथून लसूण सुमारे ९ ते १० टेम्पो आवक झाली होती.

स्थानिक भागातून झालेल्या आवकमध्ये सातारी आले सुमारे ६०० ते ७०० गोणी, भेंडी आणि गवार प्रत्येकी ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो ९ ते १० हजार पेटी, हिरवी मिरची ४ ते ५ टेम्पो, सिमला मिरची ८ ते १०, काकडी ७ ते ८ टेम्पो, कोबी ५ ते ६ टेम्पो, फ्लॉवर ८ ते १० टेम्पो, भुईमूग शेंगा ५० गोणी, तांबडा भोपळा १० ते १२ टेम्पो, कांदा सुमारे ८० ट्रक, इंदूर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ३० ते ३५ टेम्पो आवक झाल्याची माहिती ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

# कामगारांसाठी लढणारे लीडर्स हवेत : सचिन अहिर

## आकुर्डीत संजोग वाघेरे यांच्या समर्थनार्थ कामगार संघटनांचा संयुक्त मेळावा




**पिंपरी | प्रतिनिधी**

आपण संघटना म्हणून आलेल्या व्यक्ती कुठल्याही जातीच्या, धर्माचा, पक्षाचा आहेत. हे विचार करत नाही. पण, यावेळीची ही निवडणूक आपल्या सर्वांच्या जिवनाशी संबंधित निवडणूक आहे. आज देशाच्या हितासाठी आणि कामगारांच्या संघटित आणि असंघटित शक्तीसाठी लोकसभेमध्ये कामगारांचे प्रतिनिधी करणारे लोक पाठविण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. आपल्यासाठी लढणारे कामगारांचे लीडर्स पाहिजेत, भाजपच्या व्यासपीठावर बसलेले डीलर नको, पाहिजेत असे मत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे संपर्कप्रमुख तथा आमदार सचिनभाऊ अहिर यांनी व्यक्त केले. ते आकुर्डी येथील खंडोबा सांस्कृतिक भवन येथे मावळ लोकसभेचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) व महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील यांच्या प्रचारार्थ आयोजित कामगार मेळाव्यात ते बोलत होते. या वेळी मावळ लोकसभा मतदार संघाचे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे अधिकृत उमेदवार संजोग वाघेरे पाटील, कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे महाराष्ट्र राज्य प्रदेशाध्यक्ष (इंटक) डॉ. कैलास कदम, शिवसेना शहरप्रमुख ॲड. सचिन भोसले, सीआयटीयूचे पुणे जिल्हा अध्यक्ष कॉ. अजित अभ्यंकर, अखिल भारतीय कामगार सेनेचे डॉ. रघुनाथराव कुचिक, मेघाताई थत्ते, किरण मोघे, श्रमिक एकता महासंघाचे दिलीप पवार, राष्ट्रीय श्रमिक एकता महासंघाचे किशोर ढोकळे, आयटकचे कॉ. अनिल रोहम, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे गणेश दराडे, सीटूचे वसंत पवार, कष्टकरी संघर्ष महासंघाचे काशिनाथ नखाते, टाटा मोटर्स युनियनचे शिशुपाल ठोमर, इंटकचे मनोहर गाडेकर, संरक्षण कामगार संघटनेचे सुनील भालेकर, बँक कर्मचारी संघाचे सुनील देसाई, टाटा मोटर्स युनियनचे सतीश काकडे, पीएमपीएलचे राजेंद्र खराडे यांच्यासह कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कामगार वर्ग मोठ्या संखेने उपस्थित होते.

आमदार सचिन अहिर पुढे म्हणाले, देशाच्या पंतप्रधान गजनी झालेले आहेत. 2019 ला काय बोलले, 2014 ला काय बोलले, 2024 मध्ये बोलत नाही. त्यांनीच सांगितलं शेतकरी, कष्टकरी आणि कामगारांच्या जीवनामध्ये अच्छे दिन येतील आणि आता जर अशी अवस्था आहे. मात्र, कामगारांच्या प्रश्नाच्या बाबतीत चर्चा होत नाही. शेतकरी, तरुण, महिला आणि बेरोजगारी यांना काय देणार त्याची चर्चा होत नाही. सध्या देशाचे पंतप्रधान इकडे येतात 'असली नकलीचा वाद' करतात आणि भुताटकी लागल्याप्रमाणे आत्मा शोधण्याचे काम चालू आहे. देशातल्या प्रश्नांवर आणि विषयाबाबत चर्चा करत नाहीत. त्यांच्या पायाखालची वाळू घसरत चाललेली आहे. ज्यावेळी सर्व मुद्दे संपतात कुठच्याही मुद्द्याला साथ मिळत नाही. मग जाती जाती आणि धर्माधर्मामध्ये तिढा निर्माण करून आपल्यामध्ये मतभेद निर्माण करून परत एकदा सत्तेवरती बसण्याचा तो त्यांचा केविलवाणा प्रयत्न आहे.

### कामगारांचा आवाज बनणार: संजोग वाघेरे

» उमेदवार संजोग वाघेरे पाटील बोलताना म्हणाले की, ही निवडणूक आपल्या अस्मितेची आहे. देशाची प्रगती झाली का, कामगारांची प्रगती झाली का ? आपल्या शेतकऱ्यांची प्रगती झाली का ? देशामध्ये नवीन उद्योगधंदे आलेत का ? जे आहेत ते उद्योगधंदे टिकलेत का ? कामगार काय करू शकतो, हे यापूर्वी आपण देशाला, राज्याला आणि भांडवलदारांना दाखवले आहे. कामगारांची ताकद फार मोठी आहे. कामगार क्रांती आणू शकतो आणि तीच क्रांतीची मशाल आपल्याला आता लोकसभेमध्ये पाठवण्याचे काम कामगारांनी केले पाहिजे. सरकारने जे कायदे बदललेले आहेत ते कायदे रद्द केल्याशिवाय मी शांत बसणार नाही. मी तुम्हाला शब्द देतो आणि खात्री देतो जोपर्यंत हे कायदे रद्द होत नाही. तोपर्यंत कामगार म्हणून मी त्या ठिकाणी लढा देत राहणार. अनेक वर्ष कामगारांच्या व्यथा कामगारांचे जे प्रश्न आणि नीमचे प्रश्न आहेत. त्यासाठी बाजू मांडण्याचे काम करणार आहे. मी सुद्धा कामगार असल्यामुळे कामगारांच्या व्यथा मी जाणतो. कामगारांना त्यांच्या हक्काची पेन्शन मिळाली पाहिजे. आशा सेविकेंचा पगार दुप्पट करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच फोर्स मोटर्स कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपल्या खांद्याला खांदा लावून काम करेल याची खात्री देतो. कामगारांच्या प्रती जी क्रांतीची मशाल आहे. ही मशाल आपल्या कामगारांचे प्रतीक आहे. कामगारांचा प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी द्या, अशी साद उपस्थित कामगार वर्गाला घातली.

# विधानसभा मतदार संघामध्ये दोन दिवस गृहमतदान

## मतदारांसाठी गृहमतदान प्रक्रिया राबविण्याच्या निवडणूक आयोगाच्या सूचना



**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने शारीरिक दृष्ट्या अपंग (दिव्यांग) असलेले मतदार व ज्यांचे वय 85 वर्षे पेक्षा जास्त मतदार आहे. अशा मतदारांसाठी गृहमतदान प्रक्रिया राबविण्याच्या निवडणूक आयोगाच्या सूचना आहेत. त्यानुसार बुथस्तरीय अधिकारी यांचे मार्फत घरोघरी सर्व्हेक्षण करून इच्छुक मतदाराकडुन 12 ड अर्ज भरण्यात आलेले आहेत.

या अर्जाची छाननी करून 34 पैकी 5 दिव्यांगासह पात्र मतदारांसाठी टपाली मतपत्रिका तयार करणेत आलेल्या आहेत. यासाठी गृहमतदान प्रक्रिया करणेसाठी मतदारांचे प्रत्यक्ष घरी जाऊन टपाली मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडणेकामी तीन पथकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

या पथकामध्ये सेक्टर ऑफीसर, पर्यवेक्षक, केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, पोलिस अधिकारी, कर्मचारी, सुक्ष्म निरिक्षक, बीएलओ, व्हिडीयोग्राफर, यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

या पथकात नियुक्त अधिकारी, कर्मचारी यांनी दिनांक 7 मे 8 मे सकाळी सात ते सायंकाळी सहा या कालावधीत होणार आहे याबाबतची पुर्व कल्पना संबधीत मतदार यांना लेखी स्वरूपात दिलेली आहे.

भारत निवडणूक आयोग यांचेकडील मार्गदर्शक सूचनाप्रमाणे गोपनियतेचा भंग होणार नाही, याची दक्षता घेऊन मतदान प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे पिंपरी विधानसभा मतदार संघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी अर्चना यादव यांनी कळविले आहे. गृहमतदान प्रक्रियेसाठी मनोहर जावरानी यांची नोडल ऑफीसर म्हणुन नेमणुक केली आहे. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन तयार करण्यासाठी सिलिंग साहित्याचे टेबलनिहाय ट्रे बनविणे साहित्यांची नोंद विहित नमुन्यात घेण्यासाठी भांडारपाल यांच्यासह 10 अधिकारी कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

### पिंपरी येथे मतदानासाठी मतदान यंत्रे तयार


» मतदान यंत्रे तयार करणे व इतर अनुषंगीक कामे करण्यासाठी सेक्टर ऑफीसर, त्यांचे सहायक, अशा एकूण 35 टेबलसाठी 135 अधिकारी/कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. ईव्हीएम व व्हीव्हीपॅट मशीन्स केंद्रनिहाय सिलिंग करण्यास देणे व तयार झालेल्या मशीन्स केंद्रनिहाय लावून घेणे, खराब झालेली मतदान यंत्रांची नोंद घेणे व ती बदलून देणे, EMS वरील माहिती भरून पूर्ण करणे तसेच ईव्हीएम संबंधित सर्व रिपोर्टींग तयार करण्यासाठी 10 अधिकारी व कर्मचारी यांचे पथक नेमण्यात आले(आहे.

# डॉ. अमोल कोल्हे यांनी सादर केले पुरावे

## आढळराव पाटील यांनी पुरावे द्या, नाहीतर निवडणुकीच्या रिंगणातून माघारी घ्या, असे आव्हान दिले होते

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी ओतूर (ता. जुन्नर) येथील सभेत महायुतीचे उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना लक्ष करत, थेट आरोप केले होते.त्यानंतर शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पुरावे द्या, नाहीतर निवडणुकीच्या रिंगणातून माघारी घ्या, असे आव्हान दिले होते. त्यानंतर आता डॉ. कोल्हे यांनी पुरावे सादर केले असून आता आढळराव पाटील हे मुद्दे कसे खोडून काढणार हे पाहणे औत्सुक्याचे आहे.



आढळराव पाटलांनी लोकसभेत तारखेनुसार मांडलेल्या प्रश्नांची कागदपत्रे अमोल कोल्हे यांनी दाखवली आहेत. आढळराव पाटलांनी स्वतःच्या कंपनीच्या फायद्यासाठी पदाचा गैरवापर केला? असा सवाल उपस्थित करत याचं उत्तर त्यांनी जनतेला द्यावं, असे प्रती आव्हानही अमोल कोल्हेंनी दिले आहे.

तसेच हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है. असे म्हणत सोबत कागदपत्रांचा गठ्ठा दाखवत हे सगळे पुरावे टप्प्याटप्प्याने जनतेसमोर मांडणार असल्याचा इशारा दिला आहे. दरम्यान, आढळराव पाटील कोल्हेंच्या आरोप प्रत्यरोपामुळे शिरूरच्या निवडणुकीत नवा ट्विस्ट आला आहे..

शिरुर लोकसभेचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी शिवाजीराव आढळराव पाटील यांच्यावर निशाणा साधताना, आढळराव पाटील यांनी संसदेत स्वतःच्या कंपनीच्या फायद्यासाठी संरक्षण खात्याविषयीच विचारले होते, असा आरोप केला होता. यानंतर आता अमोल कोल्हे यांनी थेट पुरावेच सादर करत आढळराव पाटीलांना कोंडीत पकडत, 'हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है', असं ठणकावून सांगितलंय.

ओतूरच्या सभेत डॉ. अमोल कोल्हे यांनी प्रतिस्पर्धी उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांना लक्ष करत, हे तर लोकप्रतिनिधीच्या वेशातील व्यापारी, असा थेट आरोप केला होता. त्यानंतर शिवाजीराव आढळराव पाटील यांनी पुरावे द्या, नाहीतर निवडणुकीच्या रिंगणातून माघारी घ्या, असं आव्हान दिलं होतं. डॉ. कोल्हे यांनी हे आव्हान स्वीकारल्याच सांगत, शब्द फिरवत माघार घ्यायची नाही, असं प्रति आव्हान आढळराव पाटलांना दिलं. त्यानंतर आज त्यांनी पुरावे दाखवणारा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसिद्ध केलाय. डॉ. कोल्हेंचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होतोय.

शिरूरसारख्या ग्रामीण मतदारसंघातल्या तत्कालीन खासदार आढळराव पाटलांनी संरक्षण विभागाला डिफेन्स पार्टस पुरवणाऱ्या कंपनीचे प्रश्न विचारल्यानं नागरिकांना आश्चर्य वाटत आहे. आता आढळराव पाटील कसा 'डिफेन्स' करणार त्याकडं सर्वांचं लक्ष लागलं आहे. गावाखेड्यातले, शेतीमातीचे प्रश्न सोडून आढळराव भलतेच प्रश्न लोकसभेत मांडत असताना आढळून आल्यानं संशयाचं मळभ आणखी गडद होतय. आढळराव पाटील कोल्हेंच्या आरोप प्रत्यरोपामुळं शिरूरच्या निवडणुकीत नवा ट्विस्ट आलाय.

### पुरावे दाखवणारा व्हिडीओ दाखल

» आढळराव पाटलांनी लोकसभेत ७ एप्रिल २०१७ आणि १३ फेब्रुवारी २०१९ रोजी मांडलेल्या प्रश्नांची कागदपत्रे अमोल कोल्हे यांनी दाखवली आहेत. आढळराव पाटलांनी स्वतःच्या कंपनीच्या फायद्यासाठी पदाचा गैरवापर केला? असा सवाल उपस्थित करत याचं उत्तर त्यांनी जनतेला द्यावं, शिवाय मी पुरावे दिल्यावर लोकसभेच्या निवडणुकीतून बाहेर पडणार, हा दिलेला शब्द आता आढळरावांनी पूर्ण करावा, असं प्रती आव्हानही अमोल कोल्हेंनी दिलं आहे. तसेच 'हा फक्त ट्रेलर आहे, पिक्चर अभी बाकी है'. असं म्हणत १७ मार्च २०१७, ९ डिसेंबर २०१६ आणि २६ डिसेंबर २०१८ या तारखांना कंपनी हितासाठी मांडलेल्या प्रश्नांची आठवण करून दिली. सोबत कागदपत्रांचा गठ्ठा दाखवत हे सगळे पुरावे टप्प्याटप्प्याने जनतेसमोर मांडणार असल्याचा इशारा देत, कोल्हेंनी आढळरावांचं टेन्शन वाढवलं.

# मोदी सरकारचे निर्णय प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवा

## काँग्रेस राजवटीत 100 पैकी 15 रुपयांचा निधीच लोकांपर्यंत पोहोचायचा : चित्रा वाघ

**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेस राजवटीमध्ये 100 पैकी 15 रुपयांचा शासकीय निधी लोकांपर्यंत पोहोचत होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट लाभार्थीच्या बँक खात्यात पैसे जमा करण्यास सुरुवात केल्यामुळे 100 टक्के निधी लोकांपर्यंत पोहोचत आहे. मोदी सरकारच्या निर्णयांची माहिती भाजप कार्यकर्त्यांनी प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवावी, अशी सूचना भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी केली.



मावळ लोकसभा मतदारसंघातील शिवसेना-भाजप-राष्ट्रवादी- मनसे- आरपीआय-रासप- मित्रपक्ष महायुतीचे अधिकृत उमेदवार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या प्रचारार्थ रविवारी लोणावळा येथे महायुतीच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी चित्रा वाघ बोलत होत्या.

विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करणे आवश्यक आहे. त्यासाठी श्रीरंग आप्पा बारणे साहेब यांना धनुष्यबाण या चिन्हासमोरील बटण दाबून बहुमताने विजयी करा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आरपीआय आठवले गटाचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष सूर्यकांत वाघमारे, भाजपचे मावळ विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख रवींद्र भेगडे, मावळ भाजपा तालुकाध्यक्ष दत्तात्रय तथा भाऊ गुंड, लोणावळ्याच्या माजी नगराध्यक्षा सुरेखा जाधव, माजी उपनगराध्यक्ष श्रीधर पुजारी, लोणावळा शहर भाजपा अध्यक्ष अरुण लाड, भाजपा महिला मोर्चा जिल्हाध्यक्षा पूनम चौधरी, मावळ भाजपा महिला मोर्चा अध्यक्षा सायली बोत्रे, लोणावळा शहर भाजपा महिला आघाडी अध्यक्षा विजया वाळुंज, लोणावळा शहर भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष प्रथमेश पाळेकर यांच्यासह महायुतीचे सर्व प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

तसेच ज्यांनी राम मंदिर निर्माण कार्यास विरोध केला,ज्यांनी 370 कलम हटविण्यास विरोध केला अशा काँग्रेस, शरद पवार गट व शिवसेना उद्धव ठाकरे गटाला या निवडणुकीतून आपण हद्दपार करावे व विकसित भारतासाठी मोदी साहेबांना पंतप्रधान करण्यासाठी भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागण्याच्या सूचना केल्या.

### 100 पैकी 15 रुपयांचा निधीच लोकांपर्यंत पोहोचायचा

» काँग्रेस राजवटीमध्ये 100 पैकी 15 रुपयांचा शासकीय निधी लोकांपर्यंत पोहोचत होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी थेट लाभार्थीच्या बँक खात्यात पैसे जमा करण्यास सुरुवात केल्यामुळे 100 टक्के निधी लोकांपर्यंत पोहोचत आहे. मोदी सरकारच्या निर्णयांची माहिती भाजप कार्यकर्त्यांनी प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचवावी, अशी सूचना भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा चित्रा वाघ यांनी केली.